महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ५५ वे | दिनांक : १५/०२/२०२६ | वार : रविवार

## भारत आणि अमेरिका करारामध्ये सोयाबीन-कापूस आयातीचा उल्लेख नाही



**बीड :** आमची माय आणि आमची माती हेच आमचे खरे प्रेम आहे. ज्याप्रमाणे शिवशंभूंच्या दर्शनापूर्वी नंदीला वंदन करण्याची आपली संस्कृती आहे, त्याच धर्तीवर पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून आम्ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करत आहोत. तंत्रज्ञानाच्या जोडणीतून हे क्षेत्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावर दुग्ध उत्पादनात अग्रेसर करेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.परळीतील अंबेजोगाई रस्ता लगत असलेल्या ओपळे मैदानावर पशुसंवर्धन विभाग आयोजित तीन दिवसीय महा पशुधन एक्स्पोच्या पाहणीनंतर मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. भारत- अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा उल्लेख नसून शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन देखील त्यांनी केले.


मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, हे प्रदर्शन केवळ एक सोहळा नसून कोरडवाहू शेतीतील हवामान जोखीम (Climate Risk) कमी करण्यासाठी उचललेले एक धोरणात्मक पाऊल आहे. पिकांचे नुकसान झाले तर पशुधन हेच शेतकऱ्यासाठी आधार म्हणून काम करते. त्यामुळेच आम्ही गाईला केवळ धार्मिक महत्त्व न देता तिचे आर्थिक योगदान लक्षात घेऊन 'राज्यमाता' दर्जा दिला आहे.

दुग्ध व्यवसायातील तफावत मांडताना मुख्यमंत्री म्हणाले की, पंजाबमध्ये गाय १०-१५ लिटर दूध देते, तर आपल्याकडे २.५ लिटर ही तफावत भरून काढण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. पशुधन संवर्धन, आरोग्य व अचूक निरीक्षण आणि उत्पादकता वाढविण्यासाठी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) मिशन' चा वापर करण्यात येईल. एम्ब्रियो ट्रान्सप्लांट आणि सेक्स-सॉर्टेड सीमेन तंत्रज्ञानाद्वारे उच्च दर्जाच्या कालवडींची पैदास वाढवून दुग्धोत्पादन वाढवले जाईल. यासाठी विदर्भ- मराठवाड्यात 'मदर्स डेअरी' सोबत करार देखील करण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी क्षेत्राला जागतिक स्पर्धेपासून सुरक्षित ठेवले आहे. भारत- अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे बाहेरील माल येऊन भाव पडतील, या अफवांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. याउलट भारतीय शेतकऱ्यांना अमेरिकेची मोठी बाजारपेठ आता खुली झाली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, केवळ नोकरीच्या मागे न लागता गावातील तरुणांनी मालक बनावे, यासाठी आम्ही लवकरच 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना' आणत आहोत. महिलांना लखपती दीदी बनवण्यासाठी शासनाकडून शून्य टक्के व्याजावर कर्ज उपलब्ध करून देत आहे. तसेच पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. हा दर्जा दिल्याबद्दल मुख्यमंत्री महोदयांचे मंत्री मुंडे यांनी आभार मानले.

अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी पालन योजनेतील विजेत्यांना आणि गोपाळ रत्न पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांना यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पशुसंवर्धन विभागाच्या 'महापशुधन वार्ता' या मासिकाच्या 10व्या अंकाचे प्रकाशन व विभागाच्या 'दिनदर्शिका 2026'चे अनावरण केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'महापशुधन एक्स्पो 2026'मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत पात्र महिला बचत गटांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्ज वितरण केले. जिरेवाडी, ता. परळी येथील तुळजाई महिला स्वयंसहायता समूहास ₹15,00,000 इतक्या कर्जाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)च्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत बर्दापूर येथील 'उमेद सखी — महिला शेतकरी उत्पादक कंपनी'ला शासन अनुदानाच्या ₹12,27,500 या प्रथम हप्त्याचे वितरण करण्यात आले.

## अति तिथे माती होते : मंत्री शंभूराज देसाईंचा जयकुमार गोरेंवर अप्रत्यक्ष निशाणा



**सातारा :** जिल्हा परिषद निवडणुकीत भाजप स्वबळावर लढली, तर त्यांच्या विरोधात एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आल्याने राजकीय समीकरणे बदलली आहेत. या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसले तरी, निकालानंतर भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शिवसेना आणि राष्ट्रवादीने आता सत्तास्थापनेच्या हालचाली गतिमान केल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर, पाटण येथील विजयी सभेत बोलताना मंत्री शंभूराज देसाई यांनी सूचक वक्तव्य करत मंत्री जयकुमार गोरे यांना खोचक टोला लगावला, तसेच गणेश नाईक यांच्यावरही सडकून टीका केली आहे.

शंभूराज देसाई म्हणाले, निवडणुकीत पाटणमध्ये मोठे नेते आले, भाषणं झाली पण जिल्हा परिषदेचा निकाल बघा. एकीकडे राष्ट्रवादीचे दोन्ही गट आणि शिवसेना तर दुसरीकडे भाजप. मात्र, बेरीज काय झाली, अति तिथे माती होते. अति जाऊन कुठे केले तर माणसे योग्य वेळेची योग्य संधीची वाट बघत असतात, असे म्हणत देसाई यांनी नाव न घेत पालकमंत्री जयकुमार गोरे आणि मंत्री गणेश नाईक यांच्यावर टीका केली. गणेश नाईक यांनी शंभुराज देसाई यांना पालकमंत्री ऐवजी मालकमंत्री म्हणत टीका केली होती.

सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने सत्तेसाठी त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली असून, राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. भाजप हा सर्वाधिक जागा मिळवणारा मोठा पक्ष ठरला असला, तरी त्यांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, काँग्रेस, स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि अपक्षांनी एकत्र येत तगडे आव्हान उभे केले आहे. या पार्श्वभूमीवर, एका पंचतारांकित हॉटेलमध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या नेत्यांची महत्त्वाची बैठक पार पडली असून, मंत्री मकरंद पाटील व मंत्री शंभूराज देसाई यांनी सत्ता स्थापनेबाबत प्राथमिक चर्चा झाल्याचे स्पष्ट केल्याने जिल्ह्यातील राजकीय समीकरणे आता वेगाने बदलताना दिसत आहेत.

सातारा जिल्हा परिषदेच्या 65 जागांच्या निवडणुकीत 27 जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी बहुमतासाठी आवश्यक असलेला 33 हा जादुई आकडा गाठण्यात त्यांना अपयश आले आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (20 जागा) आणि शिवसेना (15 जागा) यांचे संख्याबळ एकत्रित 35 होत असल्याने सत्तेचे पारडे त्यांच्या बाजूने झुकले असून, सत्ता स्थापनेसाठी या दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. काँग्रेस, स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि अपक्षांची साथही या आघाडीला मिळण्याची चिन्हे आहेत. परिणामी, सर्वाधिक जागा मिळवूनही भाजपने सत्तेची संधी गमावल्याची चर्चा आता जिल्हाभरात रंगू लागली आहे.

## भाजप आमदार संजय केनेकरांच्या कार्यालयात एअरगन

**छत्रपती संभाजीनगर :** मध्ये आज सकाळी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. भाजप आमदार संजय केनेकर यांच्या क्रांती चौकातील मध्यवस्तीत असलेल्या संपर्क कार्यालयात एका बॅगेत पिस्तुलासारखी वस्तू आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. काल सायंकाळी अज्ञात व्यक्तीने ही बॅग कार्यालयात ठेवून दिल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. सुरुवातीला कुणाची तरी बॅग विसरली असावी, असा समज करून कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी ती तशीच ठेवली. मात्र सकाळपर्यंत कुणीही त्या बॅगेबाबत संपर्क साधला नाही. त्यामुळे संशय आल्याने बॅग उघडून पाहिली असता त्यामध्ये पिस्तुल आढळल्याचे दिसून आले.

घटनेची माहिती मिळताच आमदार संजय केनेकर यांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधून संपूर्ण प्रकार कळवला. पोलिसांनी तातडीने कार्यालयात धाव घेत बॅग आणि त्यातील वस्तू ताब्यात घेतली. प्राथमिक तपासात संबंधित पिस्तुल ही एअरगन असल्याचे स्पष्ट झाले आहे. तरीदेखील सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी या घटनेकडे गांभीर्याने पाहिले आहे. एअरगन कार्यालयात कशी आणि केव्हा आणली गेली, ती कोणाची आहे आणि तिचा उद्देश काय असू शकतो, याचा तपास सुरू करण्यात आला आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत वरिष्ठ अधिकारी पंकज अतुलकर घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आमदार संजय केनेकर यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून संपूर्ण घटनेची माहिती घेतली. कार्यालय परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्याचे काम सुरू झाले आहे. बॅग कार्यालयात नेमक्या कोणत्या वेळी ठेवण्यात आली, ती ठेवणारी व्यक्ती कोण होती आणि ती कोणत्या दिशेने निघून गेली, याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. कार्यालयात ये-जा करणाऱ्या व्यक्तींची नोंद आणि संबंधित कागदपत्रांची छाननी करून पुढील तपासाची दिशा ठरवली जाणार आहे.

पोलिसांनी घटनास्थळाची सखोल पाहणी केली असून एअरगनची तांत्रिक तपासणीही सुरू केली आहे. प्राथमिक चौकशीत कोणताही गोळीबार झाल्याचे संकेत आढळलेले नाहीत. तरीसुद्धा ही बाब केवळ विसरलेली बॅग होती की यामागे काही वेगळा हेतू होता, याचा शोध घेतला जात आहे. पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, बॅग कुणी आणली, कशासाठी आणली आणि ती इथे का ठेवली गेली, याची सखोल चौकशी केली जाईल. सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांच्या आधारे पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

दरम्यान, आमदार संजय केनेकर यांनी या घटनेवर प्रतिक्रिया देताना सांगितले की, त्यांनी लव्ह जिहादसह अनेक हिंदुत्ववादी मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका घेतली आहे. प्रचारसभांमध्येही त्यांनी कठोर टीका केली असून त्यानंतर अनेक वेळा उघडपणे धमक्या मिळाल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे या घटनेमागे घातपाताची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही, असे त्यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. सध्या पोलिसांनी एअरगन आणि बॅग ताब्यात घेतली असून तपास सुरू आहे. कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी सर्व बाबींची खातरजमा केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. संपर्क कार्यालयात आढळलेल्या एअरगनमुळे राजकीय वर्तुळातही चर्चा रंगली आहे. पुढील तपासातून बॅग ठेवणाऱ्या व्यक्तीची ओळख पटते का आणि या घटनेमागील कारण स्पष्ट होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ फेब्रुवारी २०२६

## मनपा शाळेत आनंददायी शनिवार आगळयावेगळया पद्धतीने साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी येथे "आनंददायी शनिवार" हा उपक्रम उत्साहात पार पडला. कला, क्रीडा, कार्यानुभव, गणित, इंग्रजी, विज्ञान, भूगोल आदी विषयांवर आधारित विविध शैक्षणिक स्टॉल्स लावण्यात आले होते. प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व मनोरंजक ऍक्टिव्हिटी आयोजित करण्यात आल्या होत्या. विशेष आकर्षण म्हणून पोयम काउंटर, पपेट शो, टेरेस गार्डन, कम्प्युटर लॅब व लायब्ररी मॉडेल सादर करण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळाले व त्यांना आनंदही मिळाला.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानदेव सांगळे (कार्यक्रमाधिकारी, छत्रपती संभाजी नगर) उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक श्री. चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकवृंदांनी मनापासून मेहनत घेतली.

## भगवान विद्यालयाच्या व्यंकटेश सानप याची एअर इंडियात पायलट पदी निवड




**आडगाव बु :** येथील भगवान विद्यालय आडगाव बु चा विद्यार्थी व्यंकटेश सानप याची एअर इंडियात पायलट पदी नियुक्ती झाली त्याबद्दल भगवान महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष राजीव वाघ व भगवान विद्यालयाचे प्राचार्य श्री संजय देसले यांच्या हस्ते व्यंकटेश सानप याचा सत्कार आयोजित करण्यात आला होता या प्रसंगी व्यासपीठावर व्यंकटेश चे वडील प्रा. नामदेव सानप, राजेंद्र पगारे, देविदास शिरसाट, बाबासाहेब बडधे, ऋषिकेश चाथे, छाया कणसे. इत्यादी उपस्थित होते.

## विद्रोही मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष लोककवी लोकनाथ यशवंत यांचा धुळयात सत्कार संपन्न



**धुळे :** नांदेड येथे विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्र राज्य च्या वतीने २० वे अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलन २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी संपन्न होत आहे. या संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध लोककवी लोकनाथ यशवंत यांची निवड करण्यात. संमेलनाध्यक्ष लोकनाथ यशवंत यांचा आज धुळयात अनिसचे कार्याध्यक्ष व सत्कार समारंभाचे अध्यक्ष अविनाश जी पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विचार मंचावर प्रमुख वक्ते पिंपळनेर चे प्रा. डॉ. सतीश मस्के, कॉ. मन्साराम पवार, कॉ. यशवंत माळचे,तिखी येथील कॉ. सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.गरुड वाचनालय, धुळे च्या सभागृह या जाहीर सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी विद्रोही चळवळ व लोकनाथ यशवंत यांच्या साहित्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, विद्रोही साहित्य संमेलन म्हणजे जुलमी, अन्यायी, अत्याचारी आणि विषमते विरुद्ध उठवलेला आवाज होय. लोकनाथ यशवंत यांनीही आपल्या विविध कविता संग्रहातील कवितेतून दलित, पीडित आणि शोषितांच्या वेदना मांडून बहुतांच्या वास्तवाच्या अत्यंत भेदक चित्रण केले आहे. कवितेतील पारदर्शक शब्दातून मानवी जीवनाचे वास्तव मांडून आंबेडकरी चळवळीतील दिखाऊपणा, ढोंगीपणा, स्वार्थांधता यावरही लोकनाथ यशवंत यांनी कडाडून हल्ला चढविला आहे. लोकनाथ यशवंत यांची कविता ही माणसांचे गीत गाते. मानवतेसाठी विषमतेवर हल्ला चढवते. यावेळी सत्काराला उत्तर देताना लोककवी लोकनाथ यशवंत म्हणाले की, खरे तर मला संमेलनाचा अध्यक्ष करून या ठिकाणी सत्कार होतो आहे त्यामुळे मी अतिशय भारावून गेलो आहे. उपस्थित असणाऱ्या स्त्रियांमध्ये मला माझी आई दिसते आहे. खरे तर आज मला माझ्या कवितेने फार मोठा सन्मान मिळवून दिला आहे. मला जे डोळ्याने दिसते तेच मी माझ्या कागदावर उतरवतो आहे. प्रवास करताना, इकडे तिकडे फिरताना मी माणसांचे जगणे, वागणे, बोलणे, चालणे आणि फिरणे बारकाईने न्याहाळतो व त्यातूनच माझी कविता जन्माला येते. माझे वडील माझ्या कविता खिशात ठेवायचे व कुणालाही वाचून दाखवायचे. त्यामुळे त्यांचेही बळ माझ्या पाठीशी खूप होते. अध्यक्षीय समारोप करताना अविनाश पाटील यांनी संमेलनाची गरज का असते हे सांगितले. त्याचबरोबर आपण जे जगतो, भोगतो आणि सोसतो ते साहित्यात मांडले जाते. पूर्वी आपल्या जीवनाचा विषय साहित्यात येत नव्हता. महात्मा फुलेंनी संमेलनास पत्र लिहून आपली भूमिका कळवली होती. व त्यांच्या साहित्य संमेलनास जाण्यास नकार दिला होता. ही व्यवस्था जुलमी आहे. माणसांचे माणूसपण हिरावून घेणारी आहे. त्यासाठी साहित्य निर्माण होणे व साहित्य संमेलने घेणे ही काळाची गरज आहे. लोकनाथ यशवंत यांच्या साहित्यानेही समाजातील वाईट प्रवृत्तीवर प्रहार केला आहे. यावेळी ॲड. विशाल साळवे यांनीही साहित्य आणि साहित्य संमेलना विषयी माहिती देऊन आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मन्साराम पवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश मोरे व मन्साराम पवार यांनी केले. आभार सुरेश मोरे यांनी मानले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाला सत्यशोधक चळवळीतील बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## टिपू सुलतान शिवाजी महाराजांच्या समकक्ष; हर्षवर्धन सपकाळांचे वादग्रस्त विधान



**बुलढाणा :** कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी वादग्रस्त विधान करत महाराष्ट्रात नव्या वादाला तोंड फोडले आहे. ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्य असा विचार दिला, अगदी त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी त्याच समकक्ष काम केले आहे. त्यामुळे टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे विधान सपकाळ यांनी केले आहे. दरम्यान, यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांना लाज वाटली पाहिजे, तसेच त्यांनी माफी मागावी, अशी मागणी फडणवीस यांनी केली आहे.मालेगावात महानगरपालिकेतील उपमहापौरांच्या दालनातील टिपू सुलतानच्या फोटोवरून वाद निर्माण झालेला असतानाच, त्यात हर्षवर्धन सपकाळ यांच्या वादग्रस्त विधानाने आणखी वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सपकाळ म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य ज्याप्रकारचे आहे, त्यांनी जो स्वराज्य विचार दिला, त्याच मांदियाळीत, त्यांच्यानंतर बऱ्याच वर्षांनी टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्याविरोधात लढा पुकारला होता. त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे योद्धे होऊन गेले, भारताचे भूमिपुत्र होऊन गेले, त्यांनी कधीही कोणत्याही विषारी, विखारी विचारांना जवळ केले नाही. त्यामुळे शौर्याचे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांच्याकडे शिवाजी महाराजांच्या समकक्ष पाहिले पाहिजे, असे सपकाळ यांनी म्हटले आहे. ते बुलढाण्यात बोलत होते. त्यांच्या विधानावर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी देखील प्रतिक्रिया देत टीका केली आहे.दरम्यान, यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी राजकारणावरही भाष्य केले आहे. ते म्हणाले, नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात 50 हजारांची लाच घेतली, हे प्रकरण फार छोटे आहे. हे संपूर्ण सरकारच लाचखोर आहे. नरहरी झिरवाळ यांच्यावर कारवाई तर व्हायलाच पाहिजे पण कोट्यवधी रुपये खाणारे देवेंद्र फडणवीसांवर काय कारवाई करणार हे आधी सांगा. या असंवैधानिक सरकारचा आम्ही निषेध करतो.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, अजितदादा आता राहिले नाही. शरद पवार आणि अजित पवार हे महाराष्ट्राचे भूमिपुत्र आहेत, त्यांचा पक्ष त्यांच्या विचाराने चालेल का? तटकरे आणि पटेल हा पक्ष चालवणार आहेत हा कळीचा मुद्दा आहे. पटेल यांचा 'तो मी नव्हेच' म्हणण्याचा जुना स्वभाव' आहे, ते पुन्हा एकदा महाराष्ट्रासमोर आले आहे. अजितदादा हे चांगले प्रशासक होते. त्यामुळे त्यांच्या निधनाची बातमी आल्यानंतर त्यांच्या कार्यालयातील लोकांनी लूट करण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही सपकाळ यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ फेब्रुवारी २०२६


## स्वप्नपूर्तीसाठी झटत रहावे - सी. ए. राजेंद्र डांगी यांचे प्रतिपादन



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** ज्ञान आणि कौशल्याच्या आधारे जीवनात उत्कर्ष साधता येतो. तुम्हाला मिळालेला जन्म सार्थकी लावण्यासाठी मोठी स्वप्ने पहा व स्वप्नपूर्तीसाठी निरंतर झटत रहा, असे प्रतिपादन पुणे येथील सी. ए. राजेंद्र डांगी यांनी केले. ते श्री माधवराव पाटील महाविद्यालय येथे बोलत होते. महाविद्यालयातील वाणिज्य विभाग आयोजित आत्मनिर्भरता आणि वाणिज्य शाखेतील व्यवसायाच्या संधी याविषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. प्रत्येकाने स्वप्ने पाहिली पाहिजेत. परंतु,ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आपल्याकडे किमान कौशल्ये असणे गरजेचे असते. जन्माने सर्व सारखेच असून कर्माने माणूसमोठा होतो. मोठे होण्यासाठी आधुनिक शिक्षण घेत उंबरठा ओलांडावा लागतो. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मोठ मोठ्या कंपन्या, लघुउद्योग, व्यापारीमॉल्स, स्टेशनरी यांना आता लेखापालाची गरज भासतआहे. व ही गरज फक्त वाणिज्यांचे विद्यार्थीच पूर्ण करू शकतात. आता प्रत्येक व्यापाऱ्याला सरकारने हिशेब ठेवणेआवश्यक केले आहे. तसेच जी. एस. टी. फाईल करणे, इनकम टॅक्स रिटर्न फाईल करणे, व्यवसाय कर भरणे.टी. डी. एस.पी. एफ., पी. टी. इ. भरवाच लागतो. यासाठीकॉमर्सच्या विद्यार्थचीच गरज असते. त्यामुळे कॉमर्स हेखूप मोठे क्षेत्र असून दरवर्षी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. यासाठी विद्यार्थांनी पदवीघेतल्यानंतर असा कोर्स कारायला पाहिजे की ज्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.यासोबतच विद्यार्थ्यांनी कौशल्याभिमुख कोर्स करून आत्मनिर्भर व्हायला पाहिजे या यासाठी विद्यार्थ्यांमध्ये पाचप्रकारचे कौशल्य असणे गरजेचे आहे. त्यामध्ये अनुभवकौशल्य, प्रैक्टिकल कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य, टेक्नॉलॉजी कौशल्य व सॉफ्ट स्किल कौशल्याचा समावेशआहे. कोणत्याही क्षेत्रात जाण्यापूर्वी त्या क्षेत्रातील संधी, तेथील सुरक्षितता, त्या क्षेत्राचे भविष्य आदी बाबी तपासल्या पाहिजेत. वाणिज्य शाखेत व्यवसायाच्या अनेक संधी असूनआयुष्य उन्नत करण्यासाठी त्या मिळविल्या पाहिजेत, असेही ते म्हणाले. अध्यक्षस्थानी मार्गदर्शन करताना सी. ए.राजेंद्र डांगी होते.प्रमुख उपस्थितीत वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.रविद्र गायकवाडहे होते. त्यांनी म्हणाले की, विद्यमान काळात कौशल्याधारित शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे. आजचे जग हे झपाट्यानेबदलत आहे.जिथे पोट भरणार नसेल तिथे वेळ वायाघालने परवडणारे नसून वाणिज्य शाखेतीलनव्या संधी शोधा, आर्थिक हित साधणाऱ्या व्यवसायाकडे वळा, असेही ते म्हणाले. यावेळी वाणिज्य विभागाचे डॉ. सुधीर पंचगल्ले, रसायनशास्त्र विभागाचे डॉ.सुजित मटकरी, प्रा.भुषण पाताळेवाणिज्य विभागाचे विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्याचा परिचय व प्रास्ताविक डॉ.रविद्र गायकवाड यांनी करुन दिला तर आभार प्रदर्शन डॉ.सुधीर पंचगल्ले यांनी मानले.

## कास्ट्राईब कर्मचारी संघटनेकडून नवनिर्वाचित जि.प. सदस्य विद्याताई गायकवाड यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** कास्ट्राईब कर्मचारी संघटनेकडून नवनिर्वाचित जिप सदस्य विद्याताई रमेश गायकवाड, माजी सदस्य रमेश दादा गायकवाड तसेच म न पा नगरसेविका दया कैलास गायकवाड याचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला या प्रसंगी संघटनेचे नेते प्रा.देवानंद वानखडे, डॉ. अनिल पांडे, सुबोधराव सावळे, डॉ. पंडित आराख, प्राचार्य डॉ ज्ञानेश्वर मानेराव, रामकृष्ण अवचार, मुख्याध्यापिका सौ सुनिता गवई (आराख) यांची उपस्थिती होती.

## सत्काराऐवजी श्रद्धांजली; साखरे बोरगाव ग्रामस्थांकडून कै. संभाजी झनझन यांना भावपूर्ण आदरांजली



**बीड (प्रतिनिधी) :** फेब्रुवारी : बीड तालुक्यातील मौजे साखरे बोरगांव चे भूमीपुत्र तथा बालेवाडी क्रिडासंकुल पुणे येथे कार्यरत असलेले सुवर्ण पदक विजेते क्रिडा अधिकारी (गट-ब) कै.संभाजी शिवाजीराव झनझन यांचा सत्कार करायचा होता.परंतु त्यांनाच भावपूर्ण श्रध्दाजंली अर्पण करावी लागतेय हे दुर्देव आहे.अशी वेळ कोणावर ही येऊ नाही!अशा शब्दात बंकटस्वामी संस्थान नेकनूर चे मठाधिपती ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले. अविवाहीत तरुण तडफदार क्रिडा अधिकारी कै.संभाजी झणझण यांचे गुजरातला प्रशिक्षणासाठी जात असताना भिषण अपघाताने दुर्देवी निधन झाले.आज त्यामुळे शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी मौजे साखरे बोरगांव येथे ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा घेऊन दोन मिनीटे मौन पाळुन भावपूर्ण श्रध्दाजंली !वाहण्यात आली.या प्रसंगी प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी शोक व्यक्त करताना कै.संभाजी झणझण यांच्या जाण्यानी गाव,राज्य व देशाच्या क्रिडा क्षेत्राची कधी ही न भरून निघणारी हानी झाली आहे.अशा शब्दात शोक व्यक्त केला. प्रा.श्रीराम झणझण यांनी ही श्रध्दाजंली वाहताना कै.सौभाजी झणझण यांच्या अनेक आठवणी सांगिचल्या.या प्रसंगी माजी मुख्याध्यापक श्री.मोहन देवगुडे, माजी सरपंच श्री.बाबासाहेब देवगुडे, श्री. अविनाश जगदाळे, श्री.रविंद्र जगदाळे, श्री. सखाराम जाधव, श्री.राजेंद्र घरत, ह.भ.प. वसंत महाराज जगदाळे, शिवसंग्रामचे युवा नेते श्री.अजिंक्य जगदाफळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी पसायदानाने शोकसभेचा समारोप करण्यात आला.या प्रसंगी पंचक्रोशीतील बहुसंख्य प्रतिष्टीत महिला, व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.कै.संभाजी झणझण यांच्या अपघाती निधना बाबत बालाघाट व पंचक्रोशीत लोक हळहळ व्यक्त करत आहेत.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ फेब्रुवारी २०२६


## सनावळयांच्या पलीकडे जाऊन इतिहास समजून घेण्याची गरज - डॉ. वासुदेव उगले



**जालना :** इतिहास हा केवळ सनावळ्यांचा, युद्धांचा आणि राजसत्तांचा आलेख नसून तो समाजजीवन, संस्कृती, विचारप्रवाह आणि मानवी मूल्यांचा सजीव पट असतो. इतिहासाकडे केवळ तारखांच्या चौकटीतून न पाहता त्यामागील वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ समजून घेण्याची गरज असल्याचे मत डॉ.वासुदेव उगले यांनी व्यक्त केले.विद्यार्थी विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व कै.डॉ. सुभाषराव ढाकणे विधी महाविद्यालय रोहनवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या सौ.क्रांतीलक्ष्मी मुदीराज होत्या तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. वासुदेव उगले उपस्थित होते. यावेळी मंचावर विशेष उपस्थिती म्हणून शहरातील ज्येष्ठ विचारवंत प्रा. बसवराज कोरे, डॉ.केशव सोळंके, व्याख्यानमाला समन्वयक प्रा. सचिन निसर्गन यांची विशेष उपस्थिती होती.याप्रसंगी 'राष्ट्रनिर्माणात स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान' या विषयावर बोलताना डॉ. उगले म्हणाले की, इतिहासाचा अभ्यास केवळ घटनाक्रमावर आधारित असल्यास तो अपुरा ठरतो. उदाहरणार्थ, स्वामी रामानंद तीर्थ यांचे कार्य केवळ हैदराबाद मुक्तिसंग्रामातील एका कालखंडापुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या सामाजिक बांधिलकी, शिक्षणविषयक दृष्टी आणि लोकजागृतीच्या संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मराठवाडा मुक्तिसंग्राम समजून घेताना स्थानिक जनतेच्या भावना, संघर्ष आणि सांस्कृतिक परिणाम यांचा अभ्यासही महत्त्वाचा ठरतो.आजमितीला शिक्षण प्रवाहातील इतिहासाच्या अध्यापनात बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांनी केवळ सनावळ्या पाठ न करता त्या काळातील समाजरचना, अर्थव्यवस्था, धर्म, साहित्य आणि विचारप्रवाह यांचा अभ्यास करावा. तसेचइतिहास समजून घेताना स्त्री-पुरुष समानता, वंचित समाजघटकांचे योगदान, लोकचळवळी आणि सांस्कृतिक परिवर्तन यांनाही स्थान देणे गरजेचे आहे. इतिहासाचा व्यापक आणि समतोल अभ्यास समाजाला अधिक सजग, चिकित्सक आणि जबाबदार बनवतो असेही ते यावेळी म्हणाले.इतिहासाच्या नव्या अभ्यास पद्धतीने स्वामी रामानंद तीर्थ यांचे राष्ट्रनिर्माणातील सामाजिक, शैक्षणिक, लोकशाही मूल्यांच्या व सांस्कृतिक, भाषिक दृष्टीने किती भरीव काम होते, हे सहज लक्षात येते. आजच्या तंत्रज्ञानाच्या पिढीला नैतिक मूल्यांची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मूल्यनिष्ठ व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीकडे विशेष लक्ष केंद्रित करावे, असेही ते यावेळी म्हणाले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्र.प्राचार्या क्रांतीलक्ष्मी मुदीराज म्हणाल्या की, खऱ्या अर्थाने इतिहास शिकण्याचा नव्हे तर समजून घेण्याचा विषय आहे. हे पहिल्यांदा तरुणांनी समजून घ्यावे. भारतीय संस्कृती ही इतिहासाच्या आकलनातूनच समृद्ध असल्याचा प्रत्यय तरुणाईला येऊ शकतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्याख्यानमाला समन्वयक प्रा. सचिन निसर्गन यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप पटेकर यांनी व प्रा.सुषमा आसुटकर यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महानगरपालिका शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ




**छत्रपती संभाजीनगर :** मनपा चिकलठाणा शाळा छत्रपती संभाजी नगर येथील वर्ग दहावीचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्रीय मुख्याध्यापक आदरणीय चौधरी सर होते. प्रमुख अतिथी श्रीमती तारो मॅडम व वाघ सर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर यांनी केले. सूत्रसंचालन राधेश्याम व संतोष गिरी यांनी केले. श्री.पठाण सर व श्रीमती शिंदे मॅडम यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.श्रीमती.तारो मॅडम यांनी परीक्षेसाठी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी श्रीमती भारद्वाज मॅडम,सासवडे मॅडम, भिंगोले मॅडम ,कवठेकर मॅडम, चव्हाण सर, सूर्यवंशी सर,साबळे बाई, खापे मामा, यांचे सहकार्य लाभले. वर्ग 9 वी च्या विद्यार्थ्यांनी श्रम घेतले.श्री. चौधरी सरांनी अध्यक्ष समारोप केला. तर मनिषा उबाळे ने आभार व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता केली.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


# पुस्तक परीक्षण - हुलबिगुल (काव्यसंग्रह)




**क**वी सखाराम डाखोरे यांचा आदिवासींच्या अस्तित्वाच्या व त्यांच्या तमाम समस्यांचा समाचार घेणारा हुलबिगुल हा कवितासंग्रह असून , भारतातील आदिवासीं सारख्या, अन्य शोषित जमातीनचा समावेश करून आपली संवेदना कायम ठेवली असून, कवीला माहित आहे की येथील शोषितांचा लढा हा एक~ एकट्याने लढता येणार नाही, त्यासाठी आपली एकजूट असणे गरजेचे आहे. ही लढाई नवा माणूस घडवण्याची आहे .माणूस म्हणून त्याला उभे करावे लागणार आहे ,म्हणूनच कवी आव्हान करतो....आपण भाकरीच बीज पेरू, ग्रंथालयाच्या कुशीत शिरू, महापुरुषाचे स्वप्न साकारू, पुन्हा एकदा तो माणूस उभारू ...शोषितांना माणूस म्हणून उभी करण्याची लढाई बिरसा मुंडा, महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभी केली होती. त्यांच्या लढ्याचा केंद्रबिंदू या देशातील दलित, आदिवासी, भटका, वंचित समूह होता. त्यांचे स्वप्न अद्यापही प्रत्यक्षात आले आहे..? का हा प्रश्न आजही आजच्या समाजासमोर आहे. "बिरसा ,बाबासाहेबांचा इतिहास पेरला पाहिजे, प्रत्येकाच्या मेंदूत सांगितला पाहिजे " वारंवार त्यांचा सामाजिक लढा आवर्जून सांगितला पाहिजे.आदिवासींची कोंडी करण्याचे सर्व बाजूने सर्व तऱ्हेने आज देशात प्रयत्न सुरू आहेत. आजचा आदिवासी पांढर~ पेशा समाजा प्रमाणेच सम दु:खी आहे, तो लढू इच्छितो व्यवस्थेविरुद्ध.... कवी सखाराम डाखोरे यांनी आपल्या कवितेतून तो सूर पेरला आहे. "आता तरी एकत्र लढायला हवं ना मित्रा" या कवितेतून कवीला कार्लमार्क्स ची आठवण होते , त्यांना आठवताना "असंख्य लिहिते हात वाकतील ." असे आवाज ....."काळोखातूनच उगवतात सूर्य तसे असंख्य लिहिते हात उगवतील शेवटच्या घटकातून." कवी सखाराम डाखोरे यांनी त्यांच्या आंधी बोलतील ही काही कविता या कवितासंग्रहात समावेश केलेला आहे सिकोन ,निसरगाचा रंग, माजुरडे,वखूत, व कहीपसून म्हणती माय. या कवितांचा विशेष असा उल्लेख करावा लागेल. या कवितांमधून औंध समाजाच्या दु:ख वेदनांना त्यांनी हात घातलेला आहे कवी सखाराम डाखोरे यांनी आजच्या समाज व्यवस्थेवर चौफेर नजर ठेवून आदिवासींच्या व्यथा वेदना काव्यसंग्रहातून मांडलेले आहेत . महानगरीतील दलित, कष्टकऱ्यांच्या दु:खालाही त्यांनी आपल्या कवितेमध्ये शब्दबद्ध केलेले आहे. त्यांची व्यथा मनातली, हुलगुल ते कवितेमधून उजागर करतात .वाचकांसाठी उत्तम असा हा कवितासंग्रह असून कवी सखाराम डाखोरे यांनी या ठिकाणी अनेक समस्यांवर चिंतन केलेले दिसते. आजच्या भांडवलशाही विरोधातला आवाज ही उठवलेला जाणवतो.

**पुस्तक परीक्षण~हुलबिगुल**
**(काव्यसंग्रह)**
**कवी सखाराम डाखोरे**
**समीक्षक-प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे**
**जालना.मो.९४२१३१९२७०**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ फेब्रुवारी २०२६


## महाशिवरात्री

महाशिवरात्रीचा
आला पवित्र सण
भक्तिभावाने करूया
शिवलिंगाचे पूजन

दूधाचा अभिषेक करूनी
बेलपत्रे अर्पण करू
शिवाचे ध्यान धरूनी
आत्मशुद्धीचा मार्ग धरू

शरीर ठेवू निरोगी
उपवास करूनी
अहंकार दूर सारू
शिवाला स्मरूनी

आध्यात्मिक जागृतीचा
महाशिवरात्रीचा हा सण
ओम नमः शिवायच्या जपाने
शुद्ध होई मन

शिवालयी पूजाअर्चा
निनादे भक्तीचा गजर
किर्तन भजनात
भक्त रमती रात्रभर




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## स्वार्थी माणसं जगतांना

वेळ पाहून माणसं इथे
नाते बदलत असतात
ज्याच्याकडे पैसा आहे
त्याच्या पंगतीत बसतात

स्वार्थ साधतांना माणसं
खोटे खोटे नाते जोडतात
पैसा संपून जाताच मात्र
नाते कायमचे तोडतात

खाऊन खाऊन संपताच
पंगत नवीन शोधतात
उपकार सारे विसरून
बदनाम करून सोडतात

कलियुगात माणसापेक्षा
पैसा झाला भाऊ प्यारा
स्वार्थी माणसाला फक्त
पैशाचाच लागतोय वारा

स्वार्थी माणसं जगतांना
कोणाचीच होत नसतात
स्वतःच्या फायद्यासाठी
पुढे पुढे पळत असतात
स्वार्थी माणसांपासून
कायम कोसो दूर रहावे
जगी कोणी नाही कुणाचा
आपणच आपले पहावे.




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**







# विद्यार्थी रमले "पाणपोई" कविता ऐकण्यात



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** बालभारतीच्या इयत्ता सहावीला असलेली कवी अय्युब पठाण लोहगावकर यांची "पाणपोई" कविता स्वतः कविच्या मुखातून ऐकूण विद्यार्थी अक्षरशाः भारावले. चापानेर येथील कस्तुरबा इंग्रजी शाळेत नुकतेच कवी आपल्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कवी अय्युब पठाण लोहगावकर यांनी स्वतः त्यांची बालभारतीच्या इयत्ता सहावीला असलेली "पाणपोई" या कवितेचे प्रभावी अध्यापन करून ही कविता मधूर स्वरात गाऊन, पाणपोई कविता कशी सुचली यामागची कल्पना व मराठवाडयात नेहमीच पाण्याची कमतरता असती. यामागील पर्यावरणाचे महत्व सांगितले. विद्यार्थी हे प्रत्यक्ष कवीला शिकवितांना पाहून त्यांना आश्चर्य वाटले, आणि समाधानही वाटले. पाणपोई ही कविता जून २०१६ पासून इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रमात असून मार्च २०२६ पर्यंत हे पाणपोई कवितेचे शेवटचे वर्षात अभ्यासक्रमात तीचा समावेश असून जून २०२६ पासून सहावीला नवीन अभ्यासक्रम राहणार आहे. या प्रसंगी, अध्यक्ष दशरथ सोमसे प्राचार्य कौशल्य सोमसे, उपप्रचार्य संदीप वाकडे, शिक्षिका वर्षा जाधव आणि शोळतील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# नोंदवलेल्या मतांच्या संख्येत आणि यंत्रावरील मतांच्या संख्येत तफावत; कर्मचाऱ्यांना नोटीस



**सिंधुदुर्ग :** जिल्ह्यातील माटणे मतदारसंघातील एका मतदान केंद्रावर मतांच्या आकडेवारीत तफावत झाल्याचे समोर आले आहे. नोंदवलेल्या मतांची संख्या व मतदान यंत्रावरील मतदान झालेल्या मतांची संख्या यात तफावत आढळून आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी संबंधित पाच कर्मचाऱ्यांना मतमोजणीच्या दिवशीचे कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. हा गंभीर प्रकार असून आपल्यावर कारवाई का करू नये, याचा खुलासा करण्याचे आदेश कसेकर यांनी दिले आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी पाठवलेल्या नोटीशीत म्हटले आहे की, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 नमूना व्हीएम-3 (नोंद झालेल्या मतांचा हिशेब) मध्ये अचूक नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. या नोटीसद्वारे आपणास कळवण्यात येते की, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 (ता. दोडामार्ग) करिता केंद्र क्र. 50/14 माटणे मतदान केंद्रावर आपली नियुक्ती केली होती. 7 फेब्रुवारीला मतदान प्रक्रिया पार पडली. 9 फेब्रुवारीला मतमोजणीवेळी टेबल क्रमांक 6 व दुसऱ्या फेरीदरम्यान जेव्हा केंद्र क्रमांक 50/14 माटणे मतमोजणीकरिता आले तेव्हा नमूना व्हीएम- 3 (नोंद झालेल्या मतांचा हिशेब) मधील नोंद केलेल्या मतांची संख्या व मतदान यंत्रावरील मतदान झालेल्या मतांची संख्या यामध्ये तफावत आढळून आली.

ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून आपणाविरुद्ध लोकप्रतिनिधित्व अधिनियम 1951 चे कलम 134 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 34 नुसार कारवाई का करू नये? याबाबतचा लेखी खुलासा नोटीस मिळताक्षणी माझे समक्ष सादर करावा; अन्यथा आपले काहीएक म्हणणे नाही, असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असे अधिकाऱ्यांनी पाठवलेल्या नोटीशीत म्हटले आहे.

कारवाईबाबत वरिष्ठ निर्णय घेणार असून निवडणूक कामात हयगय केल्याप्रकरणी कारवाईची टांगती तलवार असलेल्या त्या पाच कर्मचाऱ्यांनी आपले म्हणणे लेखी स्वरूपात मांडले आहे. त्यांचे ते म्हणणे आम्ही जिल्हास्तरावर पाठविले आहे. त्यामुळे पुढील कारवाईचे निर्णय हे वरिष्ठ घेणार असल्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रज्ञा राजमाने यांनी सांगितले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ फेब्रुवारी २०२६


# संत सेवालाल महाराज : सामाजिक पुनर्जागरणाचे प्रेरणास्थान

१५ फेब्रुवारी हा दिवस केवळ एका संतपुरुषाची जयंती म्हणून साजरा होणारा दिवस नाही, तर तो भारतीय समाजाच्या उपेक्षित, वंचित आणि दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या घटकांच्या सामाजिक आत्मभानाचा उत्सव आहे. या दिवशी संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त देशभरात विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि मध्य भारतात लाखो अनुयायी श्रद्धेने नतमस्तक होतात. मात्र संत सेवालाल महाराजांचे स्मरण केवळ भक्तीपुरते मर्यादित न राहता त्यांच्या सामाजिक कार्याच्या व्यापक अर्थाने झाले, तरच ही जयंती खऱ्या अर्थाने साजरी झाली असे म्हणता येईल.भारतीय समाजरचनेत बंजारा समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या भटक्या जीवनपद्धतीशी निगडित राहिला आहे. व्यापार, धान्यवाहतूक, गुरांचे कळप, जंगलांशी जोडलेले जीवन आणि सतत स्थलांतर या सगळ्या कारणांमुळे हा समाज मुख्य प्रवाहापासून दूर राहिला. स्थिर निवास नसल्यामुळे शिक्षण, आरोग्य, प्रशासन आणि राजकीय सहभाग यांपासून तो वंचित राहिला. अशा परिस्थितीत सामाजिक आत्मसन्मान हरवलेला, आत्मविश्वास खचलेला आणि अनेकदा स्वतःच्या अस्मितेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झालेला समाज संत सेवालाल महाराजांना लाभला.संत सेवालाल महाराजांचे महत्त्व याच ठिकाणी ठळकपणे समोर येते. त्यांनी समाजाला प्रथम बाह्य शत्रूंचा नव्हे, तर अंतर्गत दुर्बलतेचा शोध घ्यायला शिकवले. समाजाची दारिद्र्य, उपेक्षा आणि अवहेलना ही केवळ इतरांनी लादलेली स्थिती नाही, तर काही प्रमाणात आत्मविस्मृती आणि विस्कळीतपणातूनही ती निर्माण झाली आहे, हा विचार त्यांनी ठामपणे मांडला. त्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याचा पाया आत्मशुद्धी आणि आत्मसन्मान यांवर आधारित होता.संत सेवालाल महाराजांच्या विचारविश्वात व्यसनमुक्तीला अत्यंत मध्यवर्ती स्थान होते. त्या काळात मद्यपान, जुगार आणि अनियंत्रित खर्च यांमुळे अनेक बंजारा कुटुंबे आर्थिक व नैतिक अधःपतनाकडे झुकत होती. त्यांनी व्यसनाला वैयक्तिक दोष मानले नाही, तर सामाजिक आजार म्हणून पाहिले. "व्यसन केवळ शरीर नष्ट करत नाही, ते विवेक, कुटुंब आणि समाज यांनाही पोखरते," हा त्यांचा ठाम संदेश होता. त्यामुळे त्यांनी कीर्तन, संवाद आणि प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे समाजाला संयमाचा मार्ग दाखवला.त्यांच्या सामाजिक कार्यात श्रमसंस्कृतीचा पुरस्कार हा आणखी एक मूलभूत पैलू होता. श्रम हे लाजिरवाणे नाहीत, तर तेच माणसाचे खरे भूषण आहेत, असा विचार त्यांनी रुजवला. परिश्रमातून मिळवलेले अन्नच पवित्र असते आणि तेच आत्मसन्मान टिकवते, हे त्यांनी समाजाच्या मनात कोरले. भटक्या समाजाला 'आळशी' किंवा 'अविश्वसनीय' अशी लेबले लावली जात असताना, संत सेवालाल महाराजांनी श्रमशीलतेचा गौरव करून समाजाच्या प्रतिमेला नैतिक अधिष्ठान दिले.स्त्रीसन्मान हा त्यांच्या सामाजिक विचारांचा अत्यंत प्रगत आणि कालातीत पैलू मानला जातो. ज्या काळात स्त्रीला बहुतेक समाजांत दुय्यम स्थान होते, त्या काळात संत सेवालाल महाराजांनी स्त्रीला कुटुंबाची आधारशिला मानले. त्यांनी पुरुषप्रधान मानसिकतेला थेट आव्हान दिले नाही, पण स्त्रीबद्दलचा आदर, संयम आणि जबाबदारी यांची शिकवण देऊन समाजमन बदलण्याचा प्रयत्न केला. स्त्रीचे शील म्हणजे केवळ तिची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, हा संदेश त्यांच्या विचारांतून स्पष्टपणे उमटतो.संत सेवालाल महाराजांनी अंधश्रद्धा आणि कर्मकांडालाही विरोध केला. धर्माच्या नावाखाली चालणारे अवास्तव विधी, आर्थिक शोषण आणि भीतीवर आधारित श्रद्धा यांना त्यांनी स्पष्ट नकार दिला. त्यांचा धर्म हा अत्यंत साधा, माणुसकीवर आधारित आणि व्यवहार्य होता. "सेवाच खरी पूजा आहे," हा त्यांचा विचार केवळ आध्यात्मिक नव्हता, तर सामाजिक परिवर्तनाचा मंत्र होता. त्यामुळे त्यांच्या शिकवणीत बाह्य आडंबरांपेक्षा अंतःकरणातील शुद्धतेला अधिक महत्त्व होते.निसर्गाशी असलेले नाते संत सेवालाल महाराजांच्या विचारांत विशेषत्वाने दिसते. जंगल, पाणी, पशुधन आणि भूमी या सगळ्यांवर बंजारा समाजाचे जीवन अवलंबून होते. त्यांनी निसर्गाला केवळ संसाधन न मानता सहजीवी घटक म्हणून पाहिले. वृक्षतोड टाळणे, पाण्याचा सन्मान राखणे आणि प्राणिमात्रांवर दया ठेवणे, हे केवळ नैतिक उपदेश नव्हते, तर जीवनरक्षणाचे तत्त्वज्ञान होते. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर हे विचार विलक्षण दूरदृष्टीचे वाटतात.संत सेवालाल महाराजांचे कार्य केवळ वैयक्तिक सद्गुणांपुरते मर्यादित नव्हते; त्यांनी सामाजिक संघटन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. उपजाती, टोळीभेद, कौटुंबिक वाद आणि अंतर्गत मतभेद यांमुळे समाज विखुरलेला होता. त्यांनी एकतेचा संदेश देत समाजाला सांगितले की, विभाजनामुळे दुर्बलता येते, तर संघटनातून ताकद निर्माण होते. सामाजिक ऐक्य हा त्यांच्या विचारांचा कणा होता. त्यांनी शिक्षणाचा थेट प्रचार केला नसला, तरी त्यांच्या विचारांमुळे पुढील पिढ्यांमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण झाली. आत्मसन्मान जागृत झाल्यानंतर समाजाने शिक्षणाकडे वळणे स्वाभाविक होते. आज बंजारा समाजातील अनेक युवक-युवती विविध क्षेत्रांत यशस्वी होत आहेत, त्यामागे संत सेवालाल महाराजांनी दिलेला आत्मविश्वास आणि स्वत्वाची जाणीव हे बीज आहे. त्यांचे स्वतःचे जीवन अत्यंत साधे, संयमी आणि सेवाभावी होते. सत्ता, संपत्ती किंवा प्रसिद्धी यांचा मोह त्यांनी कधीच बाळगला नाही. समाजासाठी जगणे, समाजासाठी दुःख सहन करणे आणि समाजासाठी मार्गदर्शन करणे हेच त्यांचे जीवनतत्त्वज्ञान होते. त्यामुळेच ते संत होते, पण त्याहून अधिक सामाजिक दिशादर्शक होते.संत सेवालाल महाराजांचे सामाजिक कार्य त्यांच्या काळापुरते मर्यादित नव्हते; त्याचे परिणाम पुढील अनेक पिढ्यांपर्यंत पोहोचले. त्यांनी समाजमनात जे बीज पेरले, ते पुढे आत्मसन्मान, शिक्षण आणि सामाजिक संघटनाच्या रूपाने अंकुरले. ज्या समाजाला दीर्घकाळ 'भटका', 'मुख्य प्रवाहाबाहेरील' किंवा 'दुय्यम' म्हणून ओळखले गेले, त्या समाजाने हळूहळू आपली ओळख स्वतः घडवायला सुरुवात केली. ही प्रक्रिया सहज किंवा तात्काळ घडलेली नव्हती; पण तिच्या मुळाशी संत सेवालाल महाराजांनी दिलेला आत्मविश्वासाचा संदेश होता.स्वाभिमान ही केवळ भावनिक भावना नसून सामाजिक उभारणीचे बळकट अधिष्ठान असते, हे संत सेवालाल महाराजांनी ओळखले होते. त्यांनी समाजाला स्वतःकडे न्यूनगंडाने पाहू नका, तर आपल्या श्रमशीलतेचा, परंपरेचा आणि सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगा, असे सांगितले. हा विचार पुढे बंजारा समाजाच्या सामाजिक चळवळींचा केंद्रबिंदू ठरला. आपल्या अस्मितेची जाणीव झाल्यानंतरच समाज शिक्षण, संघटन आणि हक्कांच्या दिशेने वाटचाल करू शकतो, हे त्यांच्या विचारांतून स्पष्ट होते.स्वातंत्र्योत्तर काळात बंजारा समाजाने जेव्हा शिक्षणाकडे अधिक गांभीर्याने पाहायला सुरुवात केली, तेव्हा त्या मागे संत सेवालाल महाराजांच्या विचारांची प्रेरणा होती. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नव्हे, तर ते सामाजिक प्रतिष्ठा, विवेक आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग आहे, ही जाणीव समाजात हळूहळू रुजली. आज विविध विद्याशाखांमध्ये, प्रशासनात, संशोधनात, कला-संस्कृतीत आणि सामाजिक कार्यात जे बंजारा युवक-युवती सक्रियपणे कार्यरत आहेत, त्यांची ही वाटचाल संत सेवालाल महाराजांच्या सामाजिक दृष्टिकोनाचा आधुनिक विस्तार म्हणता येईल.संत सेवालाल महाराजांचे विचार आजच्या सामाजिक वास्तवात अधिक तीव्रपणे लागू पडतात. वाढती व्यसनाधीनता, कौटुंबिक विघटन, पर्यावरणीय ऱ्हास आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या सगळ्या समस्या आज समाजासमोर उभ्या आहेत. विशेषतः ग्रामीण आणि उपेक्षित घटकांमध्ये व्यसनाधीनतेमुळे आर्थिक व सामाजिक अधःपतन होत असल्याचे चित्र दिसते. अशा वेळी संत सेवालाल महाराजांचा संयम, स्वावलंबन आणि श्रमसंस्कृतीचा संदेश अत्यंत उपयुक्त ठरतो. त्यांनी व्यसनमुक्तीला केवळ नैतिक उपदेश म्हणून नव्हे, तर सामाजिक उन्नतीची अट म्हणून मांडले होते.स्त्रीसन्मानाच्या बाबतीत संत सेवालाल महाराजांचा दृष्टिकोन आजही दिशादर्शक ठरतो. स्त्रीविषयक अत्याचार, असमानता आणि असुरक्षिततेचे प्रश्न आजही समाजात गंभीर आहेत. अशा वेळी त्यांनी दिलेला स्त्री-पुरुष परस्पर सन्मानाचा संदेश केवळ ऐतिहासिक नव्हे, तर वर्तमानकाळाशी थेट संवाद साधणारा आहे. त्यांनी स्त्रीला कुटुंबाचा आणि समाजाचा केंद्रबिंदू मानले. स्त्री सुरक्षित आणि सन्मानित असेल, तरच समाज सुदृढ राहील, हा विचार आजच्या स्त्रीसक्षमीकरणाच्या चर्चांशी सुसंगत आहे.पर्यावरणसंवर्धनाचा प्रश्न आज जागतिक स्तरावर ऐरणीवर आहे. जंगलतोड, पाण्याची टंचाई, हवामान बदल आणि जैवविविधतेचा ऱ्हास या सगळ्या समस्या आधुनिक विकासाच्या अतिरेकातून निर्माण झाल्या आहेत. संत सेवालाल महाराजांनी निसर्गाशी सुसंवादाचे जे तत्त्व मांडले, ते आज 'शाश्वत विकास' या संकल्पनेशी जोडले जाते. त्यांनी निसर्गाला उपभोग्य वस्तू न मानता जीवनसहचर मानले. पर्यावरणाचे रक्षण म्हणजे पुढील पिढ्यांचे रक्षण, हा संदेश त्यांच्या शिकवणीत अंतर्भूत होता.सामाजिक एकतेचा विचार हा संत सेवालाल महाराजांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा गाभा होता. आजही जात, पंथ, भाषा आणि आर्थिक स्तरांवर आधारित विभागणी समाजात दिसून येते. या विघटनकारी प्रवृत्तींमुळे सामाजिक सलोखा धोक्यात येतो. अशा परिस्थितीत संत सेवालाल महाराजांनी दिलेला संघटनाचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. त्यांनी समाजाला सांगितले की, अंतर्गत भांडणांत ऊर्जा खर्च करण्याऐवजी सामूहिक प्रगतीसाठी एकत्र येणे आवश्यक आहे.आज संत सेवालाल महाराजांची जयंती विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम, भजन-कीर्तन आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना अभिवादन केले जाते. परंतु या उत्सवांचा खरा अर्थ त्यांच्या विचारांचे आचरण करण्यात आहे. केवळ त्यांच्या प्रतिमेला हार घालणे पुरेसे नाही; त्यांच्या विचारांना आपल्या दैनंदिन जीवनात स्थान देणे हीच खरी श्रद्धांजली आहे.विशेषतः तरुण पिढीसमोर संत सेवालाल महाराजांचे विचार नव्या स्वरूपात मांडण्याची गरज आहे. आधुनिक शिक्षण, तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाच्या काळात तरुणांमध्ये ओळखीचा, मूल्यांचा आणि सामाजिक बांधिलकीचा प्रश्न निर्माण होतो. अशा वेळी संत सेवालाल महाराजांचे जीवन तरुणांना सांगते की आधुनिकतेचा स्वीकार करताना आपली नैतिक मुळे विसरू नयेत. प्रगती आणि मूल्ये यांचा समतोल साधणे हेच खरे यश आहे.संत सेवालाल महाराजांचे कार्य एका समाजापुरते मर्यादित न राहता संपूर्ण भारतीय समाजासाठी प्रेरणादायी ठरते. त्यांनी मांडलेली सेवा, समता आणि स्वाभिमानाची तत्त्वे कोणत्याही काळात कालबाह्य होत नाहीत. त्यांनी मानवतेचा धर्म शिकविला ज्यात जात, वर्ग किंवा पंथाचे बंधन नाही. त्यामुळेच त्यांचे विचार सर्वसमावेशक आणि सार्वकालिक ठरतात.आज जेव्हा आपण १५ फेब्रुवारीला संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी करतो, तेव्हा हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा असायला हवा. आपण समाजात व्यसनमुक्तीसाठी काय करतो? स्त्रीसन्मानासाठी किती जागरूक आहोत? पर्यावरणरक्षणासाठी आपले योगदान काय आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण सामाजिक एकतेसाठी किती प्रयत्नशील आहोत? या प्रश्नांची उत्तरे शोधणे हीच जयंतीची खरी फलश्रुती आहे.संत सेवालाल महाराज यांचे जीवन म्हणजे शांत पण प्रभावी सामाजिक क्रांतीचे प्रतीक आहे. त्यांनी तलवारीने नव्हे, तर विचारांनी समाज बदलला. त्यांनी घोषणा देऊन नव्हे, तर आचरणातून परिवर्तन घडवले. त्यांच्या विचारांचा प्रकाश आजही बंजारा समाजासह संपूर्ण समाजाला दिशा देत आहे. या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करूया. स्वाभिमानाने जगणे, श्रमाचा सन्मान करणे, स्त्रीला समान स्थान देणे, निसर्गाचे रक्षण करणे आणि समाजात एकतेचे बंध मजबूत करणे हीच संत सेवालाल महाराजांच्या सामाजिक कार्याची खरी ओळख आहे. त्यांच्या विचारांचा हा दीप पुढील पिढ्यांसाठी अखंड तेवत राहो, हीच या जयंती दिनी अपेक्षा.




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

bagate.rajendra5@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002


महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ फेब्रुवारी २०२६

# संभाषण कौशल्ये : प्रभावी संवादाचे मूलमंत्र देणारे पुस्तक




**'सं**भाषण कौशल्ये' हे पुस्तक डॉ. पूनम प्रकाश वाघ (बनकर ) यांनी आजच्या युगासाठी संभाषण कौशल्याची गरज ओळखून लिहिलेले आहे. एकूण पाच प्रकरणामध्ये त्याची विभागणी केलेली आहे. खरे तर संभाषण कौशल्याची गरज आजच्या काळात खूप वाढलेली आहे. जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगात कुशल संभाषण कौशल्ये ज्यांच्याकडे आहेत तेच यशस्वी होणार आहेत. याचाच धागा पकडून डॉ. वाघ या हे पूस्तक वाचकाच्या हाती सोपवत आहेत. संभाषण कौशल्ये म्हणजे केवळ बोलणे नाही, तर योग्य प्रकारे विचार मांडणे, समोरच्याला समजून घेणे, समोरच्यांसोबत प्रभावी संवाद साधणे होय. बराचसा संवाद तर हावभावाच्या भाषेतून सुद्धा साधला जातो. म्हणून संवाद साधताना त्याला पूरक हावभाव सुद्धा तितकेच महत्त्वाचे असतात. संभाषण आपल्याला त्या त्या वयोगटानुसार करता आले पाहिजे. वयोवृद्ध ते बालक यांच्याशी ज्या पद्धतीने संवाद साधायला पाहिजे किंवा त्यांच्याशी संभाषण करायला पाहिजे याचे ज्ञान आपल्याला असले पाहिजे. म्हणजे संभाषण कौशल्ये ही एक चांगली कला आहे. सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगामध्ये आपल्याकडे जेवढी ज्ञानाची आवश्यकता आहे तेवढीच ती मांडण्याची कलासुद्धा महत्त्वाची आहे. अगोदरच आपल्याकडे म्हटले जाते 'बोलणाऱ्याच्या अंबाड्या विकतात पण न बोलणाऱ्याचे गहू सुद्धा विकत नाहीत' म्हणून आपल्याकडे प्रभावी संभाषण कौशल्ये असण्याची गरज आहे. ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, व्यवसाय या क्षेत्रामध्ये ज्ञान मांडण्यासाठी, त्याचा योग्य वापर करण्यासाठी, इतरांकडून योग्य पद्धतीने काम करून घेण्यासाठी संभाषण कौशल्ये असणे काळाची गरज आहे. कंपनी सारख्या क्षेत्रामध्ये आपण बऱ्याच वेळी ऐकतो की अमूक मुलाला ८० लाख, ७० लाखाचे पॅकेज मिळाले, तर काहींना खूप कमी लाखाचे पॅकेज मिळते. त्याचे कारण त्याच्याकडे असलेले ज्ञान, मुलाखतीच्या दरम्यान संभाषण कौशल्यातून त्याने योग्यरित्या मांडलेले असते. एकाच महाविद्यालयातून शिक्षण घेतलेल्या प्रत्येकाला वेगवेगळे पॅकेज भेटलेले असते तो याचाच भाग आहे. म्हणून संभाषण कौशल्याचे महत्त्व आजच्या शैक्षणिक, व्यावसायिक, राजकीय, सामाजिक आणि वैयक्तिक जीवनात खूप महत्त्वाचे आहे. आजच्या काळामध्ये संभाषण कौशल्ये खूप महत्त्वाचे असण्याचे कारण नेतृत्व कौशल्ये संपादन करण्यासाठी, निर्णय क्षमतेसाठी, नातेसंबंध प्रबळ करण्यासाठी, समस्यांचे निराकरण करण्यासाठी , ताणतणाव कमी करण्यासाठी, सकारात्मकतेसाठी, करिअर करण्यासाठी, व्यावसायिक यशासाठी, शैक्षणिक व वैचारिक विकासासाठी, डिजिटल युगातील योग्य शब्दांच्या निवडीसाठी आहे. संभाषण कौशल्ये विकसित करायचे असेल तर आपल्यामध्ये आत्मविश्वास असायला हवा. सर्व भाषेचा शब्दसाठा, नियमित सराव, शारीरिक भाषेचा योग्य वापर, सरळ व सोपी भाषा आणि सर्वात महत्त्वाचे इतरांचे लक्षपूर्वक ऐकण्याची सवय लावणे या गोष्टीवर लक्ष आयला हवे. या सर्व बाबींचा अभ्यास करुनच डॉ. वाघ यांनी संभाषण कौशल्ये हे अतिशय सविस्तर, अभ्यासपूर्वक असे पुस्तक लिहिलेले आहे. या पुस्तकाचे चिंतन,मनन करून आपण आपले संभाषण कौशल्ये नक्कीच वाढवू शकतो. या पुस्तकातील ज्ञानामुळे आपल्या आयुष्याला नक्कीच कलाटणी मिळणार आहे असे मला वाटते. नोकरी, व्यवसाय, नाती गोती, ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान यासाठी पूरक ठरणार आहे. पहिले प्रकरण संभाषणाचे स्वरूप, प्रक्रिया आणि महत्व विशद करणारे आहे. यामुळे आपल्याला आजच्या स्पर्धेच्या युगात संभाषणाचे कौशल्ये सुधारण्यास मदत होणार आहे. दुसऱ्या प्रकरणात संभाषणाचे प्रकार कोणते? कशाप्रकारे वापरात येतात? यावर सविस्तर चर्चा करून माहितीचे सादरीकरण केलेले आहे. संभाषण कौशल्ये विकसित करण्यासाठी आपल्याला बऱ्याच गोष्टीचे ज्ञान असावे लागते. संभाषण ही एक संवादात्मक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये दोन किंवा अधिक व्यक्ती आपापसात विचार भावना, सूचना आणि माहिती यांचे आदान प्रदान करतात. संभाषण कौशल्ये उत्तम असेल तर व्यक्ती इतरांवर आपली छाप सहज पाडतात. प्रत्यक्ष संभाषण अप्रत्यक्ष संभाषण, औपचारिक संभाषण, अनौपचारिक संभाषण, सार्वजनिक संभाषण, व्यावसायिक संभाषण, लेखन संभाषण हे संभाषणाचे प्रकार आहेत. याची उपयुक्तता प्रसंगपरत्वे, व्यक्तिपरत्वे विकसित झालेली पहायला मिळते. डॉ. वाघ यांनी तिसऱ्या प्रकरणात संभाषणात येणारे अडथळे व त्यावर कशी मात करायला हवी यावर सविस्तर विवेचन केले. ते जर आपण चांगल्या पद्धतीने आत्मसात केले तर आपले संभाषण कौशल्ये नक्कीच विकसित होतील याची त्यांना खात्री वाटते. संवाद हा सुसंवादात रूपांतरीत करण्यासाठी आपल्याला त्याचे ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. बऱ्याच वेळी आपल्याकडे ते ज्ञान असते पण त्याचे वापरण्याचे कौशल्ये माहीत नसते. ते कौशल्ये आत्मसात केल्यानंतर संभाषण चांगले करता येते. संभाषण कौशल्ये विकसित करण्यासाठी आपल्याला काही गोष्टीवर मात करावी लागते. मग त्या गोष्टी कोणत्या ? त्यावर मात कशी करायची ? अडथळे कोणती आहेत ? यावरील अतिशय सूक्ष्मपणे मांडणी डॉ. वाघ यांनी करून दिलेली आहे. चौथ्या प्रकरणामध्ये संभाषण कौशल्ये विकसित करण्यासाठीचे सविस्तर मार्गदर्शन केले आहे. जगातील प्रत्येक व्यक्तीला इतरांवर आपला प्रभाव पडावा वाटतो. हा प्रभाव केवळ चांगले कपडे परिधान केल्यामुळे, दागदागिने घातल्यामुळे पडतो असे नव्हे तर त्यासाठी संभाषण कौशल्येही तितकेच महत्वाचे असतात. त्यासाठी डॉ. वाघ यांनी संभाषण कौशल्ये विकसित करण्याची गुरुकिल्लीच आपल्या हातात दिलेली आहे. आणि शेवटचे प्रकरण संभाषण कौशल्यामुळे व्यक्तिमत्त्व विकास कसा होतो, त्यासाठी कशा पद्धतीने आपण मार्गक्रमण करायला हवे यावरील सविस्तर विवेचन आलेले आहे. व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे एखाद्या व्यक्तीचे विचार, वर्तन आणि वृत्ती सुधारण्याची एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ज्यामुळे आपले जीवन सुखकर होते. आणि व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी संभाषण कौशल्ये हा घटक तितकाच महत्त्वाचा आहे. डॉ. वाघ यांनी या पुस्तकाची निर्मिती करत असताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, व्यावसायाभिमुख विकास, व्यक्तिमत्त्व विकास व प्रभावी जीवन जगण्याचा धागा पकडून केलेली आहे.सद्यस्थितीत प्रत्येकाचा कल प्रभावी जीवन जगण्याकडे झुकलेला दिसतो.कोणत्याही एका क्षेत्रातील ज्ञान आपल्याकडे असून चालत नाही. एखाद्याच गोष्टीवर अवलंबून चालत नाही. आणि आपण अनेक क्षेत्रातील ज्ञान संपादित केले तरी ते मांडण्याची कला आपल्याकडे असणे गरजेचे आहे. ते मांडण्यासाठी आपल्याकडे संभाषण कौशल्ये असायला हवे. त्यामुळे डॉ.वाघ यांनी संभाषण कौशल्ये विकसित करण्यासाठीचे मार्गच या पुस्तकातून आपल्याला दिले आहेत. आपण सर्वजण या पुस्तकाचे स्वागत करालच. डॉ. वाघ यांना व त्यांच्या साहित्यकृतीला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !

**डॉ. नरसिंग कदम**
सदस्य, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य,
मुंबई तथा प्रोफेसर छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय,
उदगीर जि. लातूर ९४०४७३१०१०

# संजीवनी फौंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने श्री गणेश महाविद्यालयाच्या डॉ. राजेंद्र नेवगे व प्रा जगन्नाथ आदटराव यांचा सन्मान



**सिन्नर-नाशिक :** येथे संजीवनी फौंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने महाराष्ट्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमतवांचा आज दि 14 फेब्रुवारी रोजी अण्णाभाऊ साठे रंगमंच सिन्नर येथे विविध मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यामध्ये डॉ राजेंद्र नेवगे व प्रा जगन्नाथ आदटराव यांना अनुक्रमे महात्मा जोतिबा फुले ज्ञानगौरव व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर लोकगौरव पुरस्काराने सन्मानित केले.या अगोदर डॉ राजेंद्र नेवगे यांना पंचवीस राज्यस्तरीय तर दहा राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. तसेच प्रा आदटराव यांना पाच राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. दोघांनीही विविध राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक चर्चा सत्रातही सहभाग नोंदविलेला आहे.यामुळे त्यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.या प्रसंगी प्रमुख अतिथी माजी मंत्री बच्चूभाऊ कडू,माजी मंत्री रविकांत तूपकर, पदमश्री, लोककलावंत रघुवीर खेडकर,सहसचिव मृद व जलसंधारण विभाग महाराष्ट्र श्री हरिभाऊ गीते,सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विवेक कोल्हे,राज्य महिला आयोगाच्या सदस्या सौं उत्कर्षाताई रुपवते,मुख्य कार्यकारी अधिकारी पॅसीपीक हॉस्पिटलचे श्री कृष्णराज पाटील,उदय सांगळे जिल्हा परिषद सदस्य नाशिक,संग्राम शेवाळे, युवाधोरण समिती महाराष्ट्र डॉ ज्ञानेश्वर सानप आदी उपस्थित होते.श्री गणेश कनिष्ठ महाविद्यालयातील या पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे श्री गणेश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ प्रकाश भांडवलदार, सचिव श्री एल डी भांडवलदार, शालेय समितीचे अध्यक्ष सुभाषराव भांडवलदार, मुख्याध्यापक श्री राजपाल पांडे आदींनी अभिनंदन केले.